# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची शुकवार दि. १५ मार्च २००८ रोजी झालेल्या १०६ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १०६ वी बैठक शुकवार दि.१५ मार्च २००८ रोजी सकाळी ११.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिसऱ्या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २. | मा. श्री. तानाजी सत्रे, भा.प्र.से. | उपसभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३. | मा.श्री.दिलीप शिंदे | उपसचिव / गृहनिर्माण विभाग |
| ४. | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५. | मा. श्री.कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ६. | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ७. | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८. | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ९. | मा. श्रीमती.सुरेखा पाटील | सदस्य |
| १०. | मा. श्री.व्ही.जी.के. नायर | सदस्य |
| ११. | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. यांचे प्रतिनिधी | निमंत्रक |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळाचे सचिव श्री. व्ही.जी.वाणी यांनी मा.सभापती व मा. सदस्य यांचे स्वागत करुन मंडळाची १०६ वी बैठक सुरु करीत असल्याचे जाहीर केले. व मंडळाच्या दि.२२ फेब्रूवारी २००८ रोजी झालेल्या १०५ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी मंडळासमोर सादर केले.

**बाब क्रमांक : १०४/१ -**

विषय- दि.२२ फेब्रूवारी २००८ रोजी झालेल्या १०५ व्या बैठकीचा कार्यवृतांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते वर सादर करण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, पृ.क्र.७ वर एक सुधारणा करावयाची असून मागील बैठकीत त्यांनी असेसमेंट टॅक्सच्या मुद्दयावर बोलताना त्यांनी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) व ३३(९) बाबत शासनाचे जे धोरण आहे त्याची प्रत त्यांना माहितीकरिता देण्यात यावी अशी सूचना केली होती. परंतु कार्यवृत्तांत केवळ ३३(७) चा उल्लेख आहे. तरी ३३(७) व ३३(९) अशी सुधारणा करण्यात यावी अशी सूचना केली. त्याप्रमाणे कार्यवृत्तांत नोंद घेण्यात आली.

वरील सविस्तर चर्चेअंती १०५ व्या बैठकीचे कार्यवृत्त सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

---xox---

**बाब क्रमांक १०६.२**

विषय- **कार्यपूर्ती अहवाल**
१०३ व्या बैठकितील मुददे
१०४ व्या बैठकितील मुददे
१०५व्या बैठकितील मुददे

---

उपरोक्त बैठकीतील कार्यपूर्ती अहवालाचे मुद्दे पृ.क्र. २५ ते २७ वर सादर करण्यात आले आहेत.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी अशी विचारणा केली की, पृ.क्र.२५ वरील कार्यपूर्ती अहवालात काय कार्यवाही केली आहे याबाबतचा अहवाल देण्यात आलेला नाही. तो देण्यात यावा अशी सूचना केली. यावर श्री. लोहकरे, उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी खुलासा केला की, न्यायालयाने मंडळास संबंधित झोपडीधारकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. परंतु जून -२००५ च्या परिपत्रकात ताब्यात असलेल्या जमिनीवरील झोपडीधारकांना संरक्षण देण्याबाबत तरतुद आहे.त्यानुसार त्या झोपडीधारकांना संक्रमण शिबीरात जागा देऊन ती जागा खाली करुन घ्यावी लागेल. याबाबत विधी सल्लागार/प्रा. यांच्याशीही त्यांनी चर्चा केली असल्याचे सांगितले.

यावर मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, या प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. कारण सदर झोपडयांना भेट दिली असता एकाच रेशनकार्डवर त्यांनी ४ झोपडया बांधलेल्या आहेत असे दिसून आले आहे. न्यायालयाने मंडळाने निर्णय घ्यावा असे आदेश दिले आहेत. न्यायालयाने सदर आदेश देऊन आता तीन वर्षे झाली आहेत. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केली जात नाही.

मा. सभापती यांनी श्री. लोहकरे यांना सूचना दिल्या की, आठवडाभरात त्यांनी संबंधित झोपडीधारकांना नोटीस देऊन त्यांच्याकडील कागदपत्रे तपासून घ्यावीत व त्यांना संक्रमण शिबीरात हलवून ती बांधकामे तोडून जागा ताब्यात घ्यावी. यावर श्री. लोहकरे,उ.मु.अभि. यांनी माहिती दिली की, सदर झोपडीधारक १९९५ पूर्वीचे असून त्यांची जी कोर्टात केस चालू होती त्याचा निर्णय १९९० मध्ये लागूनही कोर्टाच्या निर्णयाचे कागद त्यांना अद्याप मिळालेले नाहीत. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी श्री. लोहकरे,उ.मु.अभि. यांना या प्रकरणाबाबत प्रस्ताव ८ दिवसांत सादर करावा अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी , क्लस्टर डेव्हलपमेंट अंतर्गत कामाठीपूराचा विकास कशाप्रकारे करण्यात येणार आहे त्याची माहिती द्यावी अशी सूचना केली असता मा.मुख्य अधिकारी यांनी या विषयाबाबत श्री.लोहकरे,उ.मु.अभि. यांनी पुढील बैठकीत सादरीकरण सादर करावे अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी ए.आर.पी. नावाच्या इमारतीतील लोकांना स्थलांतरित करण्यात येणार होते त्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे अशी विचारणा केली असता श्री.लोहकरे,उ.मु.अभि. यांनी माहिती दिली की ज्या पुर्नरचित इमारतीमध्ये भाडेकरुंना हलविण्याचे आहे तेथे बेस्ट चे सबस्टेशन झाले की, रहिवाशांना शिफ्ट करण्यात येईल. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी मे-२००८ अखेरपर्यंत सदर कार्यवाही करुन घ्यावी व रहिवाशांना स्थलांतरित करावे अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी असे निदर्शनास आणले की, ' ओम बाबरी निवास ' चुकीचे नांव टंकलेखित करण्यात आले आहे. त्याऐवजी 'ओम बाबदेव निवास' अशी सुधारणा करण्यात यावी अशी सूचना केली. श्री.लोहकरे,उ.मु.अभि. यांनी माहिती दिली की, सदर इमारत पी.एम.जी.पी.ची असून ' वन टाईम रिपेअर ' मधून त्या इमारतीची दुरुस्ती करण्यात आली आहे. सदर कामाची पाच वर्षांची गॅरंटी असून लिकेज बाबत ज्या तक्रारी आल्या आहेत त्याबाबत संबंधित ठेकेदारास पत्र दिले असून या महिन्यात दुरुस्तीची कामे करुन घेण्यात येतील.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी संक्रमण शिबीरातील लोकांचे भाडे घेण्यासाठी मोबाईल व्हॅन असावी. कारण भाडेवसुलीकार कधी कधी भाडयापोटी मोठी रक्कम जमा करीत असतात. एवढी मोठी रक्कम घेऊन फिरणे त्यांच्यासाठी धोक्याचे असते. म्हणून भाडेवसूलीकार मोबाईल व्हॅनमध्ये बसून इमारतीच्या ठिकाणी जाऊन भाडे गोळा करु शकतो. अशी त्यांनी सूचना केली

होती. त्याबाबत काय योजना आखण्यात आली आहे याची माहिती देण्यात यावी अशी सूचना केली. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी माहिती देताना सांगितले की, भाडेवसुलीकारांना इलेक्ट्रॉनिक सुविधा देण्याची योजना प्रस्तावित असून त्याबाबतची कार्यवाही विचाराधीन आहे.मात्र अधिवेशन काळात या विषयाकडे पुरेसे लक्ष त्यांना देत येत नसल्याने पुढील बैठकीत या योजनांबाबत सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती देण्याचे प्रस्तावित आहे.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत सूचना केली होती की, चिखलवाडी येथे भाडे वसुलीसाठी भाडेवसुलीकार पाठविण्यात यावेत. त्याप्रमाणे दोन बुधवार भाडेवसुलीकार गेले परंतु पुन्हा गेले नाहीत. अजूनही तेथील सर्व इमारतामधील भाडवसूली झाली नाही. सुमारे ५५० भाडेकरु असून ब-याच रहिवाशांचे भाडे जमा करण्यात आलेले नाही. रहिवाशांची तक्रार आहे की, भाडे देण्यास उशीर झाला की, त्यांना पेनल्टी लावण्यात येते. रहिवाशी भाडे भरण्यास तयार आहेत परंतु भाडेवसुलीकारच जात नाही मग ते भाडे देणार कोणाकडे ? म्हणून नियमितपणे भाडेवसुलीकार पाठविण्यात यावा अशी त्यांनी सूचना केली. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी मंडळाकडे कर्मचारीवर्ग अतिशय कमी आहे. ८ भाडेवसुलीकारांकडे २०,००० गाळे आहेत. कर्मचा-यांची मागणी करण्यात आली असून २५ कर्मचारी मिळत आहेत तथापी त्यांची वाट न पहाता चिखलवाडी येथे भाडे वसुलीसाठी उपलब्ध भाडेवसुलीकार पाठविण्यात यावेत अशा सुचना श्री. करंजकर,उपमुख्य अधिकारी यांना दिल्या.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी शासनाकडून मंडळास मिळणा-या थकबाकीच्या प्रस्तावाबाबत माहिती देण्याची सूचना केली असता श्री. साळूंखे, मु.ले.अ.यानी माहिती दिली की, उपकरापोटी आतापर्यंत रु.४४ कोटी आले आहेत. फक्त रु.२ कोटी बाकी आहेत ते या महिनाअखेरपर्यंत मिळतील अशी अपेक्षा आहे व अंशदानापोटी ३२.४५ कोटी आले आहेत. उपकरापोटी रु.२.४७ कोटी व अंशदानापोटी रु. ५.५५ कोटी येणे बाकी आहेत. अशाप्रकारे एकूण रु. ८ कोटी येणे बाकी आहेत.ते या महिनाअखेर मिळतील अशी अपेक्षा आहे.

महानगरपालिकेडून मिळणा-या रक्कमेबाबत महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांशी बैठक झाली आहे अशी माहिती मा.मुख्य अधिकारी यांनी दिली.

वरील माहितीनंतर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, महाराष्ट्राचे अर्थमंत्री हे सुदैवाने मुंबईचे पालक मंत्री देखील आहेत. डी.पी.डी.सी.च्या बैठका झाल्या त्यामध्ये त्यांनी व मुंबईच्या सर्व आमदारांनी म्हाडास उपकरापोटी व अंशदानापोटी येणे असलेल्या थकबाकीबाबत पाठपुरावा केला आहे व शासनाने त्यांच्या मागणीची दखल घेतली असून यापुढेही म्हाडास वेळेवर निधी मिळत राहील अशी अपेक्षा व्यक्त केली.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी अशी सूचना केली की, नौशिर भरुचा मार्गावर ५-६ वर्षापूर्वी पुनर्रचित करण्यात आलेल्या इमारतीतील गाळयांचे वितरण अजून करण्यात आलेले नाही त्या इमारतीस भेट देऊन इमारतीची अवस्था काय आहे त्याची पाहणी करावी व निर्णय घेण्यात यावा. अधिका-यांनी दोन रहिवाशांना गाळे वितरीत केले आहेत असे सांगितले. परंतु मेन्टेनन्स भरावा लागेल म्हणून ते राहण्यास येत नाहीत. इमारतीचे आणखी ७ भाडेकरु कोठे आहेत त्यांचा शोध घेऊन त्यांना वितरण घेण्याबाबत कळविण्यात यावे. अन्यथा मास्टर लीस्टवरील लोकांना त्या गाळयांचे वाटप करावे.

यावर मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, संबंधित रहिवाशांना सदर इमारतीचे गाळे वितरण घेण्यासाठी वर्तमानपत्रातून नोटीस जाहीर करावी व त्यांना एक महिन्याची मुदत द्यावी व त्या मुदतीत ते पुढे आले नाहीत तर मग मास्टरलीस्टवरील लोकांना गाळे देण्यास हरकत नाही. यावर श्री. महाजन, स.मु.अ. यांनी माहिती दिली की, या इमारतीतील ४ रहिवाशांची न्यायालयात केस चालू आहे.

अतिरिक्त गाळयांबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, एकूण ६२४ अतिरिक्त गाळे आहेत. हे सर्व गाळे पुढील तीन महिन्यात वितरीत करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे. मास्टर लीस्टवर १९९० सालापर्यंतचे ९०० अर्जदार असून त्यांच्या कागदपत्रांची छाननी चालू आहे. जे पात्र ठरतील त्यांना उपलब्ध गाळयांची माहिती देण्यात येईल व गाळे वितरण करण्यात येईल. न्यायालयाला देखील मास्टर लीस्टवरील गाळयांच्या वितरणाबाबत माहिती द्यावयाची आहे.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी कुलाबा संक्रमण शिबीरामध्ये किती गाळे अतिरिक्त आहेत, घुसखोर किती आहेत, गाळयांचे क्षेत्रफळ किती आहे, विकासकाला तेथे गाळे दिले असल्यास त्याची माहिती देण्याची सूचना केली असता मा.मुख्य अधिकारी यांनी संबंधित अधिकारी श्री.बगाटे हे विधानसभेच्या कामकाजात व्यस्त असल्यामुळे ते आता सभागृहात हजर नाहीत. मा.सदस्यांना याबाबतची माहिती स्वतंत्रपणे लेखी देण्यात येईल.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी कुलाबा संक्रमण शिबीरातील रहिवाशांनी त्यांना सांगितले की, तेथे कोणीतरी विकासक आला आहे व तो त्यांच्या जागेचा पुनर्विकास करणार आहे व त्याला ती जागा मिळाली आहे असे त्यांना सांगत आहे. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, कुलाबा संक्रमण शिबीरात जे लोक अनेक वर्षांपासून वास्तव्य करीत आहेत व ज्यांच्या इमारती तयार होणार नाहीत त्यांना तेथेच जागा बांधून द्यावी अशी त्यांची मागणी आहे. याबाबतचा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात येईल व मंजूरीसाठी तो नंतर शासनाकडे पाठविण्यात येईल.

मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांसाठी विमा योजना लागू करणेबाबत मुद्दा उपस्थित केला असता मा.मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, प्राधिकरणाच्या १९९६ च्या ठरावानुसार विमा कंपनीस मंडळ रु.५,९४,०००/- इतकी रक्कम भरते. इमारतीस दुर्घटना घडली व त्यातील किंवा त्या लगतच्या इमारतीतील वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना काही इजा झाली तर मृत व्यक्तीस रु.१०,००० व गंभीररित्या जखमी झालेल्या व्यक्तीस रु.५०००/- दिले जातात. ते देखील मंडळाने प्रस्ताव विमा कंपनीकडे पाठविल्यानंतर कंपनीने तो प्रस्ताव मंजूर केल्यानंतर पैसे देता येतात. मा.मुख्य अधिकारी यांनी सदरची योजना फायदेकारक नसून नवीन योजना राबविण्याबाबत विचार करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

यावर मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी असे निदर्शनास आणले की, उपकरप्राप्त इमारतीस अपघात होऊन जर रहिवाशी जखमी झाला की, जखमी व्यक्तीस म.न.पा.च्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात येते. या हॉस्पिटलमध्ये कधी कधी तांतडीने औषधे उपलब्ध होत नाहीत. म्हणून अशा जखमी व्यक्तींना म्हाडाच्या अधिका-यांनी जर ती जखमी व्यक्ती अपघातग्रस्त इमारतीत रहात होती असे प्रमाणित केले तर संबंधित विमा कंपनी आवश्यक ती पैशाची मदत किंवा अन्य ती मदत तांतडीने उपलब्ध करुन देऊ शकते. म्हणून शासनाच्या ज्या विमा कंपन्या आहेत त्यांना मंडळातर्फे विमा योजना राबविण्यासाठी विचारणा करण्यात यावी. त्यांनी काही विमा कंपन्यांशी संपर्क साधला आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी याची सूचना अतिशय चांगली असून असे मत व्यक्त केले व मुख्य लेखाधिकारी यांना सूचना दिल्या की, त्यांनी मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांच्याकडून संबंधित विमा कंपन्यांची नांवे घेऊन त्यांच्याशी त्वरित संपर्क साधावा व कोणत्या कंपनीकडे चांगली योजना याची प्रथम माहिती घ्यावी.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी अशी सूचना केली की, ज्या विमा कंपन्या आहेत त्या कंपनीचे प्रतिनिधी व मा. सदस्य यांची संयुक्त बैठक आयोजित करावी व विमा योजना राबविण्यासंदर्भात चर्चा घडवून आणावी.

मा. सभापती यांनी सूचना केली की, मंडळाच्या मुख्य लेखाधिकारी यांनी प्रथम विमा योजनांची माहिती घेऊन मंडळाच्या नियमानुसार जी विमा योजना फायदेशीर असेल अशा ४-५ विमा योजना मंडळासमोर विचारार्थ ठेवाव्यात व मंडळाने त्यावर चर्चा करून निर्णय घ्यावा. पावसाळयापूर्वी मे-२००८ पर्यंत विमा योजना राबविण्याबाबत निर्णय घेतल्यास लोकांना माहितीसाठी ती जाहीर करणे योग्य राहील. तसेच जिल्हाधिका-यांच्या मदती व्यतिरिक्त म्हाडाच्या रिझर्व फंडातूनसध्दा काही मदत देता येत असेल तर ती दिली पाहिजे असे मत व्यक्त केले.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी कलम ३३ (९) अंतर्गत असेसमेंट कशाप्रकारे आकारला जातो त्यासंबंधीच्या जी.आर.ची प्रत त्यांना अद्याप देण्यात आलेली नाही असे निदर्शनास आणले असता मा.मुख्य अधिकारी यांनी सदर प्रत मा. सदस्यांना देण्याच्या सूचना उपमुख्य अभियंता श्री. लोहोकरे यांना दिल्या.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी अनुपालन अहवालामध्ये मा. सभापती यांनी निदर्शनास आणलेल्या जे.जे.हॉस्पिटलच्या बाजूला रिचर्डसन क्रूडासच्या समोरील एक इमारत पुनर्रचित होऊन तयार आहे परंतु गाळयांचे वितरण झालेले नाही. त्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे याचा अहवाल देण्यात आलेला नाही असे निदर्शनास आणले.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, सदर इमारतीतील रहिवाशांची त्यांनी बैठक घेतली असून रहिवाशांची अशी तक्रार आहे की, त्यांच्या मुळ गाळयाचे क्षेत्रफळ २९० चौ.फू. होते. व त्यांना २२५ चौ.फू.चा एक गाळा देण्यात येत आहे. त्या रहिवाशांनी २२५ चौ.फू.चे दोन गाळे द्यावेत व अतिरिक्त क्षेत्रफळाचे ते पैसे भरण्यास तयार आहेत अशी मागणी केली आहे. परंतु व्हेरिफिकेशनमध्ये २९० चौ.फू. क्षेत्रफळ होते असे दिसून आलेले नाही. त्यामुळे रहिवाशांना २२५ चौ.फू.चे दोन गाळे न देता एकच गाळा देण्यात येईल असे स्पष्ट केलेले आहे. मा. सभापती यांनी सहमुख्य अधिकारी श्री.महाजन यांना सूचना दिल्या की, गाळे रिक्त पडून असून त्यामध्ये घुसखोरी होऊ नये म्हणून सदर रहिवाशांची त्यांनी बैठक घ्यावी व सदर गाळे वितरण करण्याबाबत निर्णय घ्यावा तसेच रहिवाशांना जाणीव द्यावी द्यावी की, जर त्यांनी गाळयांचे वितरण स्विकारले नाही तर ते गाळे नाईलाजाने मास्टरलीस्टवरील लोकांना वितरीत करण्यात येतील. याबाबत पुढील बैठकीत जी कार्यवाही करण्यात येईल त्याबाबत माहिती देण्यात यावी.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी मा.मुख्य अधिकारी यांचे ते घुसखोरांवर कारवाई करण्यासाठी जी योजना आखत आहेत त्याबद्दल अभिनंदन केले. व त्यांनी विचारणा केली की, घुसखोरीची व्याख्या काय आहे. घुसखोर पुनर्रचित इमारतीत आहेत व संक्रमण शिबीरात आहेत. पुनर्रचित इमारतीतील घुसखोर हे पैसे देऊन खोल्या विकत घेऊन रहात आहेत व संक्रमण शिबीरातील घुसखोर असे आहेत की, त्यांनी व्हेकेशन नोटीस विकत घेऊन ते रहात आहेत. कायदयानुसार संक्रमण शिबीरातील गाळा विकता येत नाही हे जरी खरे असले तरी कायद्यानुसार संक्रमण शिबीरात वास्तव्य सहा महिन्यांसाठी किंवा एक-दोन वर्षांसाठी तात्पुरते असते. मंडळाच्या कायद्यानुसार १० वर्षे गाळा हस्तांतरण करता येत नसेल व जर रहिवाशाला २०-२०, २५-२५ वर्षे जर संक्रमण शिबीरात राहावे लागले व रहिवाशाला पैशाची गरज असेल, मुलीचे लग्न करावयाचे असेल, घर विकून गावी जावयाचे असेल तर अशा रहिवाशाने त्याचा गाळयाचा हक्क विकला तर तो गाळा विकत घेणारा घुसखोर समजायचा का? म्हणून घुसखोरीचे वेगवेगळया कॅटगरी केल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे पुनर्रचित इमारतीत घुसखोरी करणा-या माणसाने कशा पध्दतीने गाळा मिळविला, तो तेथे किती वर्षांपासून राहतो, त्याला किती पेनल्टी आकारता येईल.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी असे प्रतिपादन केले की, सेस इमारतीच्या रहिवाशाला त्याचा गाळा विकण्याचा अधिकार आहे. त्याची सेस इमारत पडल्यानंतर त्याला मंडळाने संक्रमण शिबीरात जागा दिली. सदर संक्रमण शिबीरात २-३ वर्षे राहून पुनर्रचित गाळा मिळण्याची त्याने वाट पाहिली. परंतु त्याला मंडळाने १० ते १५ वर्षे पुनर्रचित गाळा दिला नाही. मध्यंतरी आर्थिक अडचणीमुळे त्याने गाळा विकून टाकला. असे विकत घेणा-या व्यक्तीही घुसखोर ठरतात का ?

यावर मा. मुख्य अधिकारी यांनी घुसखोरांचे १०-१२ प्रकार असून गाळा कशाप्रकारे मिळविला आहे याचे वर्गीकरण चालू असून तपासणी करण्यात येत आहे. पुढील बैठकीपर्यंत माहिती पूर्ण झाल्यास ती सादर करण्यात येईल असा खुलासा केला.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी कुलाबा संकमण शिबीरामध्ये २७ वर्षांपासून वास्तव्य करणा-या भाडेकरुंचे तेथेच पुनर्वसन करण्याबद्दल मंडळाकडून एक सकारात्मक प्रस्ताव शासनास सादर करावा अशी सूचना केली. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी याबाबतचा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात येईल अशी माहिती दिली.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी बैठकीत मा.सदस्य मांडत असलेल्या मुद्यांवर करण्यात येणा-या कार्यवाहीबाबत अनुपालन अहवालामध्ये माहिती देण्यात येत असल्याबद्दल मा.मुख्य अधिकारी यांचे अभिनंदन केले. तर मा. सभापती यांनी अधिका-यांना अशी सूचना केली की, मा. सदस्यांनी बैठकीत मांडलेल्या मुद्दयांबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरुपात परस्पर संबंधित सदस्यांना दिल्यास त्या मुद्दयांवर पुन्हा चर्चा करण्याची गरज राहणार नाही.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी टी.ओ.टी.बंद करण्यात आलेले आहे त्याबाबतची माहिती अनुपालन अहवालामध्ये देण्यात आलेली नाही असे निदर्शनास आणले असता मा.मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, टी.ओ.टी.बंद करण्याबाबतचा शासनाचा जो निर्णय आहे त्याची तारीख चुकून ०१.०७.२००६ लिहिण्यात आली असून ती ' १.६.२००५ ' अशी आहे.

मा. सभापती यांनी सचिव श्री. वाणी यांना सूचना केली की, सदर शासन निर्णयाची प्रत त्यांच्याकडे देण्यात यावी कारण अधिवेशन कालावधीत ते मा.प्रधान सचिव यांच्याशी या विषयाबाबत चर्चा करतील. तसेच मा. मुख्यमंत्री महोदय यांनी मुंबईतील आमदारांची बैठक बोलाविली आहे त्या बैठकीत देखील हा विषय घेता येईल. सदर सूचनेनुसार शासन निर्णयाची प्रत मा. सभापती व मा. सदस्यांना देण्यात आली.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे मत व्यक्त केले की, धोकादायक इमारतीतील संक्रमण शिबीरात पाठविलेला भाडेकरु पुनर्रचित इमारतीत रहावयास येतो तेव्हा तो मंडळाचा भाडेकरु असतो. असे भाडेकरु संक्रमण शिबीरात राहून पाच वर्षे झाली असतील तर त्यांना त्याचा गाळा विकण्याचा अधिकार असला पाहिजे. कारण त्याची आर्थिक परिस्थिती बिकट असेल, तो आजारी असेल व त्याला पैशाची गरज असेल.यावर मा. सभापती यांनी अशी माहिती दिली की, जो पर्यंत मुळ मालमत्ता मंडळातर्फे संपादित केली जात नाही तोपर्यत ती मालमत्ता मालकाची असते. कारण तो सेस भरत असतो. मालमत्तेचे भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर मंडळ मालक असते.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी असे निदर्शनास आणले की, संसद सदस्य मा.श्री. मिलींद देवरा व पेट्रोलियम मंत्री मा.श्री. मुरली देवरा यांना त्यांनी कुलाबा आणि खेतवाडी येथील दोन इमारतींचा भूमिपूजन समारंभ गुढीपाडव्याच्या दिवशी त्यांच्या हस्ते होण्यासाठी मा. सभापती श्री. सचिनभाऊ अहिर यांनी विनंती केली आहे. म्हणून सदर दोन इमारती शुभारंभासाठी तयार असणे आवश्यक आहे. यावर श्री. लोहकरे यांनी सदर दोन्ही इमारतींच्या प्रस्तावांना प्राधिकरणाची मंजूरी आवश्यक आहे असे निदर्शनास आणले असता मा.मुख्य अधिकारी यांनी प्राधिकरणाची मंजूरी घेण्यासाठी प्रस्ताव पुढील आठवडयात त्यांच्याकडे आणावा अशा सूचना दिल्या.

**बाब क्रमांक १०६.३**

विषय- उत्तर परीमंडळातील उपकरप्रापत इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

--------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.३१ ते १३३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती उत्तर परीमंडळातील ४२ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.४,२९,४४,२२४/- व निव्वळ रक्कम रु. २,४६,४९,१२४/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक १०६/८८३**

उत्तर परीमंडळातील एकूण ४२ उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

------------------------------------xox------------------------------------

**बाब क्रमांक १०६.४**

विषय- अ) दक्षिण परीमंडळातील उपकरप्रापत इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

--------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.१३५ ते १५५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

दक्षिण परीमंडळातील ६२ उपकरप्रापत इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.६,५८,१७,३६८/- व निव्वळ रक्कम रु. ३,३३,६८,५८८/- देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक १०६/८८४**

दक्षिण परीमंडळातील एकूण ६२ उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

------------------------------------xox------------------------------------

**बाब क्रमांक १०६.५**

विषय- ब) इमारत क्रमांक १९१ यु / व्ही केव्हल क्रॉस लेन क्रमांक ९ सुधारीत अंदाजपत्रकावर झालेल्या खर्चाला मंडळाची मंजुरीबाबत.

-----------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.१५७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

चर्चेअंती इ.क्र.१९१ यु / व्ही केव्हल क्रॉस लेन क्र. ९ च्या सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त येणारा खर्च रु.२५,५३५/- या रक्कमेस मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक १०६/८८५**

इ.क्र.१९१ यु / व्ही केव्हल क्रॉस लेन क्र. ९ च्या सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त येणारा खर्च रु.२५,५३५/- या रक्कमेस मंजूरी देण्याचे एकमताने ठरले. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

---

सचिव श्री. वाणी यांनी बाब टिप्पणी क्रमांक १०६-४अ मध्ये एक दुरुस्ती असून त्या दुरुस्तीचे शुध्दीपत्रक सर्वांना वाटण्यात आले आहे असे निदर्शनास आणून एकूण संख्येमध्ये चुकीने ६ कोटी २९ लाखऐवजी ६ कोटी ५८ लाख नमूद करण्यात आले होते.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी दुरुस्तीच्या प्रस्तावांना मंजूरी दिल्यानंतर पुढील कार्यवाही किती दिवसात करण्यात येते अशी विचारणा केली असता सचिव श्री. वाणी यांनी माहिती दिली की, अंदाजपत्रक मंजूर झाल्यानंतर तांत्रिक मान्यता घ्यावी लागते, त्यानंतर डी.टी.पी. त्यानंतर निविदा मागविणे व नंतर कामाचे आदेश देणे इ. कार्यवाहीसाठी साधारणतः २ ते ३ महिने लागतात. रुपये ५ लाखापर्यंतच्या कामांना कार्यकारी अभियंता यांना मंजूरीचे अधिकार आहेत त्यावरील रक्कमेची अंदाजपत्रके मंजूर करण्याचे अधिकार उपमुख्य अभियंता यांना आहेत.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी अशी सूचना केली की, मोडकळीस आलेल्या इमारतींचा काही भरोसा नसतो म्हणून पावसाळयापूर्वी दुरुस्तीची कामे सुरु होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी अशी सूचना केली की, आजच्या बैठकीत दुरुस्तीच्या ज्या कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे ती कामे कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पावसाळयापूर्वी कामे सुरु करण्यात यावीत. मा.मुख्य अधिकारी यांनी सूचना केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास सर्व मा. सदस्यांनी मंजूरी दिली.

**बाब टिप्पणी क्र.१०६.६**

विषय- म्हाडा अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव.

---

१. इमारत क्रमांक ३८, कामाठीपूरा ९वी गल्ली,
२.इमारत क्रमांक ६३-६७ डिमटीकर मार्ग,हाशिम मॅन्शन,
३. इमारत क्रमांक ८५,८१,८३ सोराबजी मिस्त्री बिल्डिग,
४. इमारत क्रमांक ६५-६५अे, ६७,७३ बी वाकडी चाळ न्यु प्रभादेवी रोड
५. इमारत क्रमांक ६३ अे वाकडी चाळ, न्यु प्रभादेवी रोड
६. इमारत क्रमांक ६९,६९अे,७१-७१अे,७३-७३अे,व ७५-७५अे, व ७७-७७अे ३-३एफ वाकडी चाळ न्यु प्रभादेवी
७. इमारत क्रमांक ७०, एन एम जोशी मार्ग
८. इमारत क्रमांक ४६-५०, लकी मॅन्शन,क्लोअर रोड
९. इमारत क्रमांक ११-२०, आग्रीपाडा, ई.विभाग

---

उपरोक्त ९ इमारतींना म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव सादर करण्यात आले. सदर प्रस्तावांची माहिती सचिव यांनी सभागृहास दिली.

उपरोक्त प्रस्तावांवर चर्चा करताना मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी त्यांना पूर्वी रहिवाशांची यादी देण्यात येत होती. आता ती का देण्यात येत नाही अशी विचारणा केली. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी रहिवाशांची यादी ना हरकत प्रमाणपत्र देताना प्रमाणित केल्यानंतर

देण्यात येईल असा खुलासा केला. पूर्वी कलम ३३ (९) अंतर्गत ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव सादर करण्यात येत होत व मंडळामार्फत बांधकाम करण्यात येत होते. त्यावेळी नकाशे, अंदाजपत्रके तयार करणे, भाडेकरुंची यादी व त्यांच्या क्षेत्रफळ इत्यादी बाबी तपासून एकत्रित प्रस्ताव तयार करण्यात येत होता व आता जे प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत ते इमारत दुरुस्ती पलिकडे घोषित करण्यापुरताच मर्यादित प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत. ३३ (९) अंतर्गत ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव सादर करण्यात येतील तेव्हा मा. सदस्यांना रहिवाशांची यादी देण्यात येईल.

मा. सभापती यांनी मा. मुख्य अधिकारी यांच्या खुलाशानंतर अधिक माहिती देताना असे निदर्शनास आणले की, न्यायालयाच्या आदेशानुसार ८८ (३) (अ) घोषित केल्याशिवाय कलम ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत कोणत्याही इमारतीस ना हरकत प्रमाणपत्र देता येणार नाही. त्यामुळे सरसकट ८८ (३) (अ) नुसार जे काही अर्ज आले असतील त्या इमारतींची माहिती प्रमाणित करण्यात येते. व मंडळाकडून ३३ (९) अंतर्गत कार्यवाही सुरु करण्यात येते. व मध्यंतरी जर रहिवाशी ३३ (७) अंतर्गत पुनर्बांधणी करण्यास पुढे आले तर त्यावेळी मंडळाकडून रहिवाशांची यादी प्रमाणित करुन इतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.

वरील सविस्तर चर्चेअंती म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याचे उपरोक्त ९ प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**<u>ठराव क्रमांक : १०६/८८६</u>**

म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याच्या खाली दर्शविलेल्या ९ प्रस्तावांना एकमताने मंजूरी देण्याचे ठरले. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास एकमताने मंजूरी देण्यात आली.

१. इमारत क्रमांक ३८, कामाठीपूरा ९वी गल्ली,
२.इमारत क्रमांक ६३-६७ डिमटीकर मार्ग,हाशिम मॅन्शन,
३. इमारत क्रमांक ८५,८१,८३ सोराबजी मिस्त्री बिल्डिंग,
४. इमारत क्रमांक ६५-६५अे, ६७,७३ बी वाकडी चाळ न्यु प्रभादेवी रोड
५. इमारत क्रमांक ६३ अे वाकडी चाळ, न्यु प्रभादेवी रोड
६. इमारत क्रमांक ६९,६९अे,७१-७१अे,७३-७३अे,व ७५-७५अे, व ७७-७७अे ३-३एफ वाकडी चाळ न्यु प्रभादेवी
७. इमारत क्रमांक ७०, एन एम जोशी मार्ग
८. इमारत क्रमांक ४६-५०, लकी मॅन्शन,क्लोअर रोड
९. इमारत क्रमांक ११-२०, आग्रीपाडा, ई.विभाग

---

**<u>बाब टिप्पणी क्र.१०६.७</u>**

विषय- दक्षिण परिमंडळातील प्रस्तावित दुरुस्ती कामांना प्रशासकिय मंजुरीसाठी अंदाजपत्रकांची यादी.

---

विषयांकित प्रस्ताव पृ.क्र.२०५ ते २१३ वर सादर करण्यात आले आहेत.

दक्षिण परिमंडळातील प्रस्तावित दुरुस्ती कामांना प्रशासकिय मंजुरीसाठी अंदाजपत्रकांच्या यादीतील अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक १०६/८८७**

दक्षिण परिमंडळातील प्रस्तावित दुरुस्ती कामांना प्रशासकिय मंजुरीसाठी अंदाजपत्रकांच्या यादीतील अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे एकमताने ठरले.

-------------------------oo-------------------------

**बाब टिप्पणी क्र.१०६.८**

विषय- मुंबई बेटावरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

---

१. भुकर पहाणी क्र.२३१२,२३१३ व २३१४, भुलेश्वर विभाग इमारत क्र.१७ व २१-२३ के झवेरी मार्ग, मुंबई -२ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२. भुकर पहाणी क्र. २/११११ गिरगांव विभाग, उपकर क्र. डी-२१५६(३), इ.क्र. १९८-ए, खेतवाडी बॅक रोड, मुंबई-४०० ००४, येथील "सुवर्ण महल" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

३. भुकर पहाणी क्र.२३०६,२३०८ व २३०९, भुलेश्वर विभाग इमारत क्र.१४,१८ व २० के झवेरी मार्ग, मुंबई -२ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४. भुकर पहाणी क्र.४६१ टी.पी.एस-४, माहीम विभाग, इमारत क्रमांक १०, यशवंत भवन के.डब्लू चीतळे पथ, दादर मुंबई -२८ येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

५. भुकर पहाणी क्र.१९७ / ७४,परेल शिवडी विभाग इमारत क्रमांक १८२ व ४०-५२ दळवी बील्डींग उपकर क्रमांक फ / द १९८ (१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग दादर मुंबई-१२ येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

६. भुकर पहाणी क्र.९९७-टी.पी.एस - ४ माहीम विभाग, इमारत क्रमांक २-४ ए व ११-१७, डॉली हाऊस, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर (प ) मुंबई-४०० ०२८ या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

७. अंतीम भुखंड क्र. ५५, टी.पी.एस.४, माहिम विभाग, इ.क्र. ७, एन.सी. केळकर मार्ग, मुंबई येथील उषा मेन्शन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

८. भुकर पहाणी क्र.१७८२-ए, प्लॉट क्रमांक ७२-ए टी.पी.एस-४, माहीम विभा, उपकर क्रमांक ग-उत्तर / ४६५७(३), डॉ.एम.बी.राऊत रोड, शिवाजी पार्क मुंबई येथील संतोष बिल्डिंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

९. भुकर पहाणी क्र. १६७७ भायखळा विभाग, उपकर क्र. ई-४०६५(१), इ.क्र.३/५, घेलाबाई लेन, मोरलॅन्ड रोड, मुंबई-४०० ०८ येथील कामाठी चाळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

---

सचिव श्री.वाणी यांनी उपरोक्त ९ पुनर्विकासाचे विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, पुनर्विकासाचे प्रस्ताव बैठकीच्या नियमित विषयसूचीमध्ये घेण्यात यावेत. आयत्यावेळच्या विषयांमध्ये एखाद दुसरा तांतडीचा प्रस्ताव असेल

तर सादर करावा. व पुढील बैठकीपासून या सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी. यावर मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी या मताशी सहमती दर्शवून नियमित विषयसूचीमध्ये पुनर्विकासाचे प्रस्ताव घेतल्यास त्यांनादेखील वाचण्यास वेळ मिळेल व चर्चा करता येईल असे प्रतिपादन केले.

**ठराव क्रमांक : १०६/८८८**

मुंबई बेटावरील खालील ९ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१. भुकर पहाणी क्र.२३१२,२३१३ व २३१४, भुलेश्वर विभाग इमारत क्र.१७ व २१-२३ के झवेरी मार्ग, मुंबई -२ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२. भुकर पहाणी क्र. २/१११११ गिरगांव विभाग, उपकर क्र. डी-२१५६(३), इ.क्र. १९८-ए, खेतवाडी बॅक रोड, मुंबई-४०० ००४, येथील "सुवर्ण महल" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

३. भुकर पहाणी क्र.२३०६,२३०८ व २३०९, भुलेश्वर विभाग इमारत क्र.१४,१८ व २० के झवेरी मार्ग, मुंबई -२ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४. भुकर पहाणी क्र.४६१ टी.पी.एस-४, माहीम विभाग, इमारत क्रमांक १०, यशवंत भवन के.डब्लू चीतळे पथ, दादर मुंबई -२८ येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

५. भुकर पहाणी क्र.१९७ / ७४,परेल शिवडी विभाग इमारत क्रमांक १८२ व ४०-५२ दळवी बील्डींग उपकर क्रमांक फ / द १९८ (१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग दादर मुंबई-१२ येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

६. भुकर पहाणी क्र.९९७-टी.पी.एस - ४ माहीम विभाग, इमारत क्रमांक २-४ ए व ११-१७, डॉली हाऊस, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर (प) मुंबई-४०० ०२८ या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

७. अंतीम भुखंड क्र. ५५, टी.पी.एस.४, माहिम विभाग, इ.क्र. ७, एन.सी. केळकर मार्ग, मुंबई येथील उषा मेन्शन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

८. भुकर पहाणी क्र.१७८२-ए, प्लॉट क्रमांक ७२-ए टी.पी.एस-४, माहीम विभा, उपकर क्रमांक ग-उत्तर / ४६५७(३), डॉ.एम.बी.राऊत रोड, शिवाजी पार्क मुंबई येथील संतोष बिल्डिंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

९. भुकर पहाणी क्र. १६७७ भायखळा विभाग, उपकर क्र. ई-४०६५(१), इ.क्र. ३/५, घेलाबाई लेन, मोरलॅन्ड रोड, मुंबई-४०० ०८ येथील कामाठी चाळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

---------------------------------------X0X---------------------------------------

मा.सदस्य श्री.व्ही.जी.के. नायर यानी अशी सूचना केली की, असा एक नोडल ऑफिसर असावा की, ज्यांनी मा. सदस्यांमध्ये व मंडळाच्या अधिका-यांमध्ये कोऑर्डीनेशन करावे.

यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, या मंडळाचे पूर्वीचे सचिव व आताचे सचिव यांनी सर्व मा. सदस्यांमध्ये व मंडळाच्या अधिका-यांमध्ये कोऑर्डीनेशन आणण्याचे काम केलेले आहे. सचिव या पदाची जबाबदारी मा.सदस्यांमध्ये कोऑर्डीनेशन आणण्याची आहे. त्याप्रमाणे सर्व सदस्य आताचे सचिव श्री. वाणी यांच्याशी संपर्क करु शकतात.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी अशी सूचना केली की, उपकरप्राप्त इमारतीतील लोकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी मंडळाचे सदस्य या नात्याने ते जनतेशी संपर्क साधू इच्छितात. त्यासाठी आठवडयाने किंवा पंधरा दिवसानंतर एक दिवस निश्चित करुन विभागीय कार्यालयात एक ठिकाणी बसून जनतेशी संपर्क साधतील. या सूचनेशी सहमती दर्शवून मा. सभापती यांनी विभागीय कार्यालयात किंवा त्यांच्या दालनात सर्व सदस्यांनी एक दिवस निश्चित करुन जनतेशी संपर्क साधू शकतात असे सांगून त्यामुळे लोकांचीही कामे सुकर होतील असे मत व्यक्त केले.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी अशी सूचना केली की, ते व इतर मा. सदस्य हे मा. सभापती व मा. मुख्य अधिकारी यांचेसह संक्रमण शिबीरास अचानक भेट देऊ इच्छितात. अधिवेशन संपल्यानंतर एक दिवस त्यांनी वेळ द्यावा अशी विनंती केली.

मा.सदस्य श्री. नंदकुमार काळे यांनी असे निदर्शनास आणले की,त्यांनी एका संक्रमण शिबीराराचा सर्वे केला होता. त्या संक्रमण शिबीरामध्ये १२८ गाळे आहेत त्यामध्ये ७० मुळ भाडेकरु आहेत व बाकीचे ५८ लोक घुसखोर आहेत असे त्यांना दिसून आले. त्यावेळी त्यांनी एका खाजगी आर्किटेक्चरला जमिन मोजून दिली. एक आराखडा तयार केला आहे. १८० चौ.फू.चे संक्रमण गाळे बनवावयाचे असतील आताच्या १२८ गाळयाऐवजी ३१० संक्रमण गाळे बनू शकतील एवढी तेथे जागा आहे. शिवाय खाजगी विकासकांकडून हे काम करुन घेतले व त्यांना २.५ च.क्षे.नि.उपलब्ध करुन दिला तर त्यांना विकण्यासाठी आणखी १०० सदनिका उपलबध होतील. म्हाडास मिळणारे ३१० संक्रमण गाळे तो खाजगी विकासक मोफत बांधून देण्यास तयार आहे. सदर प्रस्तावाची प्रत मा. मुख्यमंत्री महोदय यांना तसेच मंडळाच्या अधिका-यांना दिलेली आहे. एवढया चांगल्या प्रस्तावाचा विचार व्हावा अशी त्यांनी विनंती केली. त्यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळाच्या ५६ संक्रमण शिबीरांमध्ये १९००० गाळे उपलब्ध आहेत व खाजगी विकासकांमार्फत आणखी १९००० गाळे उपलब्ध होत असतील तर त्या प्रस्तावाचा विचार होणे आवश्यक आहे अशी विनंती शासनाचे प्रतिनिधी उप सचिव यांना केली. शासनाचा, म्हाडाचा फायदा होत असेल तर खाजगी विकासकांच्या प्रस्तावाचा विचार झाला पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले.

यावर मा. सभापती यांनी असे मत मांडले की, संक्रमण शिबीराला लागून असलेल्या जागांवर एस.आर.ए.मार्फत कामे चालू आहेत किंवा ज्या म.न.पा.च्या मालमत्ता आहेत त्या मालमत्तांचा ३३ (७), ३३ (९), किंवा ३३ (१०) अंतर्गत विकास कामे चालू असतील आणि ते विकासक संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास करण्यास पुढे येऊन जॉईंट व्हेंचरमार्फत संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास करण्यास तयार असतील तर त्याचा विचार व्हावा असे सदस्यांचे म्हणणे आहे असे सांगून हा विषय धोरणात्मक बाब असून नगरविकास खात्याशी असल्याने या प्रस्तावावर शासनाकडून विचार व्हावा असे मत व्यक्त करुन सदर प्रस्तावाची प्रत उप सचिव यांच्याकडे दिली.

मा.सदस्य श्री. नंदकुमार काळे यांनी अे विभाग, सी विभाग व डी विभागत एक ठेकेदार प्रत्येक वेळी ३० ते ४० टक्के कमीने निविदा भरतो व शेवटी तो काम सोडून देतो असे मागील ६ महिन्यात ४ वेळा झालेले आहे. त्यामुळे मंडळाचे नाव खराब होते. यावर मा. सभापती यांनी संबंधित ठेकेदाराचे नाव श्री. सावंत, का.अ. यांनी मा. सदस्यांकडून घ्यावे व पुढील कारवाई करावी अशा सूचना दिल्या.

मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी काही संक्रमण शिबीराना दुरुस्तीची अतिशय गरज असल्याचे निदर्शनास आणले मा. सभापती यांनी ज्या संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे त्या संक्रमण शिबीरातसुध्दा दुरुस्तीची आवश्यक ती कामे करण्याबाबत त्यांनी मागील बैठकीत सूचना केली होती असे निदर्शनास आणले.

यावर उपमुख्य अभियंता श्री. पाटील यांनी बेसिक दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत, मोठी कामे करण्यात येत नाहीत अशी माहिती दिली. मा.मुख्य अधिकारी यांनी अशा दुरुस्तीच्या कामांना मंडळाच्या मान्यतेची गरज आहे का अशी विचारणा केली असता श्री. पाटील यांनी

दुरुस्तीचे प्रस्ताव तयार असून त्या प्रस्तावांना मंडळाच्या मान्यतेची गरज नाही कारण ती त्यांच्या अधिकारातील आहे अशी माहिती दिली.

मा. सदस्या श्रीमती.सुरेखा पाटील यांनी प्रभादेवी येथील लुईस वाडीच्या पुनर्विकासाबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे अशी विचारणा केली असता निवासी कार्यकारी अभियंता श्री. वाणी यांनी माहिती दिली की, प्रस्तावाची छाननी चालू आहे. तेथे दोन इमारती आहेत.एका इमारतीचा प्रस्ताव दिला आहे दुसरी इमारत तशीच ठेवण्यात येणार आहे. लँड कंपोनन्ट आणि रिहॅब कंपोनन्ट किती आहे याचा तपशील अद्याप संबंधित वास्तुशास्त्रज्ञाने दिलेला नाही. जी दुसरी इमारत पुनर्विकसित केली जाणार नाही त्या इमारतीचा एफ.एस.आय. दुसरीकडे वापरता येणार नाही. संपूर्ण तपशील आल्यानंतर छाननी करण्यात येईल व पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात येईल.

यावर मा. सदस्या श्रीमती.सुरेखा पाटील यांनी इमारत अतिशय धोकादायक असल्याचे निदर्शनास आणले असता मा. मुख्य अधिकारी यांनी दोन्ही इमारतींचा पुनर्विकासाचा प्रस्ताव आला पाहिजे होता. एक इमारत तशीच ठेऊन पुनर्विकास कसा करता येईल. इमारत धोकादायक असल्यास रहिवाशांना संक्रमण शिबीरात हलविण्यात येईल असे निदर्शनास आणले असता मा.सदस्या श्रीमती पाटील यांनी दुस-या इमारतीची कोर्ट केस चालू असल्याचे सांगितले. कोर्टाचा निकाल लागेपर्यंत ही इमारत कोसळली तर काय अशी विचारणा केली. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी या प्रकरणात काय अडचण आहे याची माहिती घेण्यासाठी संबंधितांना कार्यालयात बोलवावे अशा सूचना निवासी कार्यकारी अभियंता यांना दिल्या.

मा. सदस्या श्रीमती.सुरेखा पाटील यांनी कन्नमवार नगर,विक्रोळी येथील सुमारे १५०० संक्रमण गाळयांची स्थिती चांगली नसल्याचे निदर्शनास आणले. इमारत क्र.१८७ व १९० ची सिलींग प्लास्टर कोसळले होते. मंडळाकडून अद्याप दुरुस्ती करुन देण्यात आलेली नाही अशी विचारणा केली. यावर श्री. पाटील, उपमुख्य अभियंता यांनी माहिती दिली की, तेथे पुनर्विकास प्रस्ताव राबविण्यात येणार असून या महिन्यात त्या इमारती पाडण्यात येणार असल्यामुळे दुरुस्ती करण्यात आलेली नाही.

मा. सदस्या श्रीमती.सुरेखा पाटील यांनी कन्नमवार नगर येथे इमारत क्र.१०८, १०९, ११० व १२२ धोकादायक म्हणून घोषित करुनही पुढील कार्यवाही का थांबली आहे अशी विचारणा केली. लोकांना पर्यायी जागा का देण्यात आल्या नाहीत. यावर संबंधित अधिकारी श्री. बगाटे यांनी येत्या १५ दिवसांत हया इमारतील लोकांची पात्रता तपासून त्यांना हलविण्यात येईल व जे अपात्र असतील त्यांना निष्कासित करण्यात येईल अशी माहिती दिली.

मा. सदस्या श्रीमती.सुरेखा पाटील यांनी गाळा क्र.१८०/६४२१ या एका गाळयाच्या दुरुस्तीचे काम चालू आहे. इतर गाळयांच्या दुरुस्तीचे काम का करण्यात येत नाही अशी विचारणा केली. यावर मा. सभापती यांनी श्री. झुबेर, का.अ. यांना सूचना दिल्या की, याबाबत तपासणी करुन मा.सदस्यांना अहवाल द्यावा.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, पुनर्विकासाकरिता कन्नमवार नगर येथील लोकांना पुनर्विकास होईपर्यंत मुलूंड येथे हलविण्यात येणार होते. परंतु तेथे जाण्यास त्या लोकांची तयारी नाही. त्यांना तेथेच जागा हवी आहे. काही लोकांना तेथे जाग देण्यात आल्या होत्या त्याप्रमाणे त्यांनाही तेथेच जागा द्यावी असे त्यांचे म्हणणे आहे.

मा. सदस्या श्रीमती.सुरेखा पाटील यांनी अनेक संक्रमण शिबीरात काही गाळयांना दरवाजे., खिडक्या नाहीत, सिलिंग कोसळतात, टेरेसवर, बाथरुममध्ये गळती आहे तेथे कामे करण्यात आली पाहिजे असे मत व्यक्त केले असता जेथे दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहेत ती कामे करण्यात येत असलयाचे अधिका-यांनी सांगितले आहे. परंतु पुनर्विकास करण्यात येणा-या संक्रमण शिबीरांच्या इमारती तोडण्यात येणार आहेत. तेथे दुरुस्तीची कामे करण्यात येणार नाहीत.

मा. सभापती यांनी असेही निदर्शनास आणले की, दुरुस्तीसाठी खर्च किती करावयाचा याचा विचार करावा लागेल कारण पुनर्विकास करण्यात येणा-या संक्रमण शिबीरांसाठी सुमारे ९ कोटी रुपयाचा फंड वापरल्याबद्दल ऑडीट ऑब्जेक्शन घेण्यात आले होते व संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्यात येणार होती. म्हणून नंतर दुरुस्तीची कामे बंद करण्यात आली होती. नंतर जेव्हा त्यांच्या सरकारचे मंडळ आले तेव्हा ज्या संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास आणखी ३-४ वर्षे होणार नसेल तर दुरुस्ती करण्यास काय हरकत आहे अशी भूमिका त्यांनी घेतली व पुन्हा आवश्यक ती दुरुस्तीची कामे करण्यास सुरुवात करण्यात आली.

मा. सभापती यांनी बैठकीच्या अखेरीस सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

29/12/08

मा. मुख्य अधिकारी, मुं.इ.दु.व पु.मंडळ

नि.का.अ/सचिव
दु व पु मंडळ

मा. सभापती, मुं.इ.दु.व पु.मंडळ